# पोलीस आयुक्त अमरावती शहर येथील बेवारस वाहनांचा जाहिर लिलाव

## पोलीस आयुक्त, अमरावती शहर अधिनस्त पोलीस स्टेशन मधील बेवारस वाहनांचा (भंगार) एकत्रीत लिलाव करावयाचा आहे

वाहनाचा सविस्तर तपशिल

| अ. क्र. | वाहनांचा प्रकार | वाहनांची संख्या | वाहनांची किंमत | सद्यास्थितीत वाहने ठेवण्यात आल्याचे ठिकाण | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 01 | दुचाकी मोटार सायकल | 140 | 4,45,600/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| 02 | तिन चाकी ऑटो | 01 | 2500/- | | |
| 03 | चार चाकी क्वॉलीस | 01 | 18,000/- | | |
| | एकुण | 142 | 4,66,100/- | | |

सदर वाहने सद्यास्थितीत ज्या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहेत त्या ठिकाणी पहावयास मिळतील. तरी लिलावात भाग घेवु ईच्छीनाऱ्यांनी निश्चित ठिकाणी उपस्थित राहावे.

:- लिलावाचा तपशिल - :

1. लिलावाचा दिनांक व वेळ :- दिनांक 23.06.2021 वेळ सकाळी 10.00 वा.
2. लिलाव करणाऱ्या कार्यालयाचे नांव :- पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर

लिलावाच्या अटी व शर्ती सविस्तरपणे पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथील सुचना फलकावर पहावयास मिळतील, त्याचप्रमाणे लिलावाचे तारखेला लिलाव सुरु होण्यापुर्वी लिलावाच्या अटी व शर्ती वाचुन दाखविण्यात येतील. काही अपरीहार्य कारणामुळे नियोजीत तारखेचे दिवशी लिलावाचे काम पुर्ण झाले नाही तरी दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी सकाळी 10.00 वा. लिलावाचे कामकाज सुरु करण्यात येईल.

### :- जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती - :

1. लिलावाता बोली बोलण्यापुर्वी रुपये 1,00,000/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) एवढी अनामत रक्कम पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांच्याशी संपर्क करुन डी.डी. व्दारे **P.A. TO C.P. Amravati City** या नावाने दिनांक 22.06.2021 चे 17.00 वा. पावेतो जमा करावी लागेल. त्याशिवाय बोलामध्ये भाग घेता येणार नाही.
2. लिलाव करावयाची वाहने ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत स्विकारावी लागतील.
3. लिलाव करण्यात येणारी वाहने स्क्रॅप मटेरियल (भंगार) म्हणुन स्विकारण्यात येणार असुन सदरील बेवारस वाहने रोडवर वापरात आणात येणार नाही. रोडवर आढळल्यास संबंधीत व्यक्ती विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
4. ईच्छुक बोलीदारास निश्चित केलेल्या किंमतीच्या पुढे बोली बोलावी लागेल, त्यापेक्षा कमी बोली बोलता येणार नाही.
5. जाहीरातीचा होणारा खर्च ज्याची बोली अंतिम करण्यात येईल त्याला भरावा लागेल.
6. ईच्छुक बोलीदारांना लिलावात काढलेली बेवारस वाहने लिलावापुर्वी 05 दिवस आधीपासुन संबंधीत पोलीस स्टेशन येथे पाहता येतील. बोलीदारांनी वाहनांची तपासणी केली असेल असे गृहीत धरुन नंतर त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही किंवा स्विकारली जाणार नाही.
7. सर्वाधीत बोली बोलणाऱ्या बोलीदाराला बोलीच्या 25% रक्कम लिलाव अधिकाऱ्याकडे डी.डी. व्दारे **P.A. TO C.P. Amravati City** या नावे त्वरीत भरावी लागेल. बोलीची उर्वरित रक्कम पुर्ण भरेपर्यंत लिलावाच्या साहित्याची जबाबदारी बोलीदाराची राहील त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. सदर रक्कम मुदतीत न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व सदरची बोली रद्य करण्यात येईल.
8. ज्याची सर्वाधीत बोली असेल त्यांनी जर वाहने स्विकारण्यास नकार दिला तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व त्यालगतची बोली बोलणाऱ्यास वाहने देण्याबाबतचे अधिकार पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांना राहतील.
9. बाोलीदाराने पुर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर वाहने 10 दिवसाचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात न घेतल्यास पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांना लिलाव रद्य करण्याचा अधिकार राहील व संबंधीतांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
10. यशस्वी बोलीदाराने वाहने खरेदीच्या रकमेवर नियमानुसार विक्रीकर व ईतर सर्व प्रकारचे कर व शुल्क (GST) स्वत: भरणे बंधनकारक राहील. कोणत्याही करातुन सुट मिळण्याचे प्रमाणपत्र वाहने खरेदीदाराला मिळणार नाही.
11. बोलादाराची बोली कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे लिलाव कायम करणे किंवा कोणतेही कारण न देता वेळेवर रद्य करण्याचे संपुर्ण अधिकार पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांनी स्वत:जवळ राखुन ठेवलेले आहे.

( विक्रम साळी )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर